PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 2

# संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातील जीवन तत्त्वज्ञान

**प्रा. पद्माकर डिगांबर वानखडे**
ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर
**महाराष्ट्र भारत**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज म्हणजे आदर्श जीवनाचा कळसाध्याच होय, असे असले तरी सर्वसामान्यांच्या जीवनातील चढ उतार त्यांनी अनुभवलेत. त्यांनी आपल्या विविध अभंगातून जणू जीवनाची रहस्य उलगडलीत. त्यांची अभंग आजही शतकानुशतकांपासून समाजाला मार्गदर्शन करीत आहे. संत तुकारामांच्या गाथेतील अधिकाधिक अभंग ईश्वर भक्तीशी जुडलेले असले तरी त्यांच्या अभंगात समाजाचे सूक्ष्म निरीक्षण असल्याचे दिसते. खरी ईश्वरभक्ती सत्यनारायणाच्या पूजेत, पुराणातील भाकडकथा यात नसून भावपूर्ण मानसपूजेत आहे, हे त्यांनी सर्व सामान्य जनतेला पटवून दिले. त्याकाळात एखाद्या विचार रूढीपरंपरेच्या विरोधात जाऊन जनतेच्या गळी उतरविणे, हे कठीण कार्य त्यांनी नेटाने केल्याचे दिसते. त्यांच्या अभंगातील अर्थपूर्णता, सहजता, लयबद्धता व चटकदारपणामुळे अनेक अभंगाना सुभाषिताचे रूप प्राप्त झाले आहे.

**तुका म्हणे अवघें फिकें भावाविण। मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ।।**
**काय काशी करिती गंगा। भीतरीं चांगा नाही त्या ।।**

मिठाशिवाय ज्याप्रमाणे अन्न रूचकर लागत नाही, त्याप्रमाणे मनात खरोखर भक्तीभाव नसेल तर काशीक्षेत्र, गंगा नदी काहीच करू शकणार नाही. कुचर दाणा पाकात टाकला तरी तो तसाच राहतो, त्याप्रमाणे प्रेमाशिवाय बोलणे म्हणजे नुसतेच भुंकणे होय, असे वरील अभंगात संत तुकाराम महाराज सांगतात. भावातच देव दडलेला असल्याचे ते सांगतात. जग हे बहुरंगी आहे. जगात कसे वावरावे, जगांशी संबंध ठेवतांना येणाऱ्या अडचणी सांगतांना ते अभंगात म्हणतात,

**बहु बोलों जातां म्हणती हा वाचाळ । न बोलतां सकळ म्हणती गर्वी ।।**

**भेटीसी न वजतां म्हणती हा निष्ठुर । येतां जातां घर बुडविलें ।।**

जगात कसे वागावे हा प्रश्नच आहे. जास्त बोलल्यास लोक आपणास बडबड्या आहे, असे म्हणतात. कमी बोलल्यास गर्वीष्ठ असल्याचे आपल्यावर ठपका ठेवतात. कुण्या आप्तेष्ठास भेटला नाही तर त्याच्यावर निष्ठुरपणाचा शिक्का बसतो व त्याच्या घरी ये—जा केल्यास उगाच त्रास देतो म्हणतात. घर बुडव्या म्हणून त्याला हिणवतात. या सर्वबाबीचा आपण मध्यबिंदू साधावा व वेळ काढून हरीभक्ती करावी, असे ते म्हणतात.

**जन हें सुखाचे दिल्या घेतल्याचें । अंत हें काळीचें नाही कोणी ।।**
**ज्याल्या हीन शक्ती नाक डोळे गळती । सांडोनिया पळती रांडापोरें ।।**

समाजातील दाहक अनुभव सांगतांना संत तुकाराम महाराज म्हणतात, संसारात अनेक लोक केवळ दिल्या घेतल्याचे असतात. जोवर आपल्याकडे धन, संपत्ती, प्रतिष्ठा आहे, तोपर्यंत आपल्या जवळ जवळ राहतात. 'असतील शिते तर जमतील भुते' या म्हणीप्रमाणे ते आपला स्वार्थ साधून घेतात. मात्र जेव्हा आपल्याला त्यांची गरज लागते, तेव्हा कुणी मदतीला येत नाही. म्हातारपणी जेव्हा नाक, डोळे गळू लागतात, तेव्हा घरचेच लोक धावून येत नाही. बायको म्हणते, ''आता मरून गेलात तरी बरे होईल. म्हाताऱ्याने चांगले घर थुंकून घाण केले.'' म्हणूनच संत तुकाराम महाराज म्हणतात की, चक्रपाणिशिवाय तुझे या जगात कुणीच नाही, त्यामुळे जीवनात विठ्ठलभक्तीची कास धरायला हवी.

जगातील जन्म आणि मृत्यू ह्या दोन बाबी अटळ व सत्य आहेत. जो जन्म घेतो, त्याचा मृत्यू होतोच. ह्या दोन बाबीमध्ये जो कालावधी आहे, तो म्हणजे जीवन प्रवास होय. आयुष्याचा शेवटचा दिवस आनंदाचा, समाधानाचा जावा यासाठी हा भक्तीचा, हातून चांगल्या कर्म घडण्याचा अट्टाहास करीत असल्याचे संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात.

**याजसाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दीस गोड व्हावा ।।**
**आतां निश्चितीनें पावलो विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ।।**

ईश्वर चिंतनामुळे तृष्णा विराम पावल्याचे ते सांगतात. समाधानी वृत्तीने जीवन जगल्यास आपले जीवन खेळीमेळीचे होऊन चिंतामुक्त होते. केवळ स्वार्थापोटी देवाला साकडे घालणारे अधम जागोजागी दिसून येतात. या अधमांना संकट आले की, त्यांना

PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 2

देवाची आठवण होते. मात्र संतपुरूष तसे नसतात. संत महात्म्यामध्ये स्वार्थपणा नसतो. संत हे परोपकारी असतात. समाजहितासाठी त्यांनी स्वत: वाहवून घेतलेले असते.

**लेंकुराचे हित । जाणे माऊलीचे चित्त ।।**
**ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ।।**

ज्याप्रमाणे मुलाचे हित कशात दडलेले आहे, हे त्याच्या मातेला ठाऊक असते त्याप्रमाणे भक्ताचे हित संत जाणून असतात. कोणता तरी त्या व्यक्तिपासून लाभ होईल या हेतूने संत कधीच पाहत नसतात. आईप्रमाणे निर्लेप प्रेम करणारे संत असतात. बुडणाऱ्याला तारण्याचे काम संताकडून होत असते. आपण बुडलो तरी चालेल पण हा जनलोक तरला पाहिजे ही भावना संताची असते. चांगले कर्म केल्यास उत्तम फळ लाभते. वर वर देखावा केल्यास त्यापासून प्राप्तीही तशीच होते, याबाबत तुकाराम महाराज आपल्या अभंगात म्हणतात—

**खोल ओली पडे तें पीक उत्तम । उथळाचा श्रम वायां जाय ।।**
**लटिक्याचे आम्ही नव्हों सांटेकरी । थिंते घाली भरी पदरींचें ।।**

शेतात पेरणी करतांना बी जमीनीत खोलवर पडल्यास, ते वाया न जाता पीक उत्तम येते. याउलट ते जमीनीवरच्या भागाने राहिल्यास कष्ट वाया जातात. सोन्यालाही आगीत तावून सुलाखून निघाल्यावर महत्त्व प्राप्त होते. जीवनात कष्टाला महत्त्व आहे आणि आम्ही कष्टकऱ्याचे, सत्यवादी लोकांचे सोबती आहोत. लटके बोलणाऱ्याचे सांगाती नव्हे, असे संत तुकाराम महाराज म्हणतात.

**कोणाही जिवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ।।**
**तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुखदु:ख जीव, भोग पावे ।।**

आयुष्यात आपल्या कडून कुणाचा मत्सर, व्देष होता कामा नाही. अवगुण अंगी येता कामा नये. कुणाचा मत्सर न करणे, हेच ईश्वराचे पूजन आहे. ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये ही एकाच देहाची अवयव होत. सुख दु:ख भोगणे जीवाच्या नशिबी असते. आमची कुणी निंदा करो वा स्तुती या दोन्ही पासून आम्ही अलिप्त आहोत. सर्व जग विष्णुमय आहे व वैष्णवाचा धर्म आहे. वारकरी संप्रदायात उच्च नीच, गरीब श्रीमंत, स्पृश्य अस्पृश्य असा भेदभाव नाही, असा विचार देऊन स्वत:च्या नावाची नाममुद्रा 'तुका म्हणे' असे देऊन अभंगातील विश्वासार्हता वाढवितात. माधव कानिटकर याबाबत म्हणतात, 'तुका म्हणे' या दोन शब्दांमागे तुकारामानं जी सुंदर

वाङ्मयमूर्ती निर्माण केली आहे, ती अद्‌भुत,आश्चर्यकारक आणि वंदनीय आहे.''[१] वरील मत उचित वाटते.

**करावी ते पूजा मनेंची उत्तम । लौकिकाचं काम काय असे ।।**
**कळावें तयासि कळे अंतरीचे । कारण ते साचें साचा अंगी ।।**

मनापासून केलेली मानसपूजा ही उत्तम असते. अगरबत्ती, देव्हारा, गंध, फुले यांनीच पूजा होते, असे नव्हे. वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू संत ज्ञानेश्वर देखील भक्ती संदर्भात हेच विचार मांडतात. फळ, पत्र, फुले यापेक्षा कर्माची पूजा श्रेष्ठ मानतांना ते दिसतात. जसे बी असेल तर तसेच फळ मिळते, त्याचप्रमाणे भजनाने मनाला समाधान मिळतेच. ढोंगी साधुच्या खोट्या, देखाव्या भक्तीवर संत परखडपणे टीका करतात. साध्या भोळ्या, अज्ञ समाजाने यापासून दूर राहावे, हे सांगतांना संत शिरोमणी तुकाराम महाराज म्हणतात—

**ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करूनी म्हणती साधू ।।**
**अंगा लाऊनी राख । डोळे झाकूनी करती पाप ।।**

ढोंगी साधू अंगाला राख, भस्म लावून लौकिकदृष्ट्या आपण संत असल्याचे बतावणी करतात व समाजाचे नुकसान करतात, अशा पाप करणाऱ्या ढोंगी साधुला, मांत्रिकाला चांगलाच चोप द्यावा. अशा पोटभरू संतापासून धोका असल्याचे संत तुकाराम महाराज कडकडून सांगतात. भारत हा धर्म, परंपरा जपणारा देश आहे व याचाच फायदा समाजकंटक लोक घेत असतात, म्हणून समाजाने वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगावा, असे ते सुचवितात. संत ज्ञानेश्वर संताला पृथ्वीची उपमा देतात कारण पृथ्वी सर्वांनाच आश्रय देते, त्याला अन्नाचा पुरवठा करते. ती व्यक्तिव्यक्तीमध्ये कोणताच भेदभाव करीत नाही. पृथ्वीचा क्षमाशिलता,समभाव हा गुण संतामध्ये दिसतो.

**सुख पाहता जवापाडे । दु:ख पर्वताएवढे ।।**
**धरी धरी आठवण । मानीं संताचें वचन ।।**

सुख आणि दु:ख एकाच नाण्याच्या बाजू आहेत. सुख हे मानणाऱ्यावर असते, परंतू माणूस हा विचित्र प्राणी आहे. त्याला सुखापेक्षा नेहमीच आपल्यावर दु:खाचा पहाड कोसळल्यासारखे वाटत असते. संत तुकाराम महाराज याबाबत तेच सांगतात, सुख हे जवापाडे लहान असते मात्र दु:ख हे पर्वताएवढे मोठे असते. मनुष्य

सुख हे क्षणात पचवितो मात्र दु:ख चघळत राहतो, असे संताचे त्रिकालबाधीत सत्य नेहमी आठवणीत ठेवावे, असे आहे.

**नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ।।**
**तैसें चित्तशुद्धी नाही । तेथें बोध करील काई ।।**

पाणी जर शुद्ध नसेल तर साबण कितीही लावले तरी कपडे स्वच्छ निघणार नाहीत. मन निर्मळ नसेल तर शरीराला कितीही साबण लावले तरी मन शुद्ध होणार नाही. एखाद्या वृक्षाला फळे, फुले येतच नसतील तर वसंत ऋतू तरी काय करणार ? असा ते प्रश्न करतात. निर्मळ मनाने ईश्वरभक्ती करून मनोभावे त्या परमेश्वराचे पूजन,भजन करावे, असा सल्ला संत तुकाराम महाराज देतात. नरदेह पुन्हा मिळणे नाही म्हणून या जन्मात क्षणाक्षणाचा विचार करून सत्कार्यासाठी आपला देह वेचावा. आपण दिवसेंदिवस वयाने जरी मोठे जात असलो तरी मृत्यूला समीप करत आहोत, हे कसे विसरत आहोत. याबाबत सांगताना संत शिरोमणी तुकाराम महाराज म्हणतात–

**क्षणाक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ।।**
**नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ।।**

आयुष्याचे सार्थक करायचे असल्यास संत समागमाची त्वरा केली पाहिजे. कारण संतच आपल्याला या संकटातून सहजपणे तारू शकतात. देह हा नाशिवंत असून त्यातील प्राण निघून गेल्यानंतर सर्व नातेवाईकांच्या समक्ष त्याचे जीवलग तो शरीररूपी देह जाळून टाकतात. म्हणून ज्याप्रमाणे परीसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते त्याप्रमाणे माझ्या अंतरी पालट घडवून आण, अशाप्रकारे संत तुकाराम महाराज म्हणतात.

एकूणच संत तुकाराम यांच्या प्रत्येक अभंगात एक विचार आहे. प्रेरणा आहे. त्यांच्या अभंगातून नवविधा भक्ती, आराध्य दैवत विठ्ठलावरील प्रेम, जीवनविषयक तत्त्वज्ञान जागोजागी दिसून येते. संत तुकारामाच्या समाजकार्याचे मूल्यमापन करतांना डॉ.निर्मलकुमार फडकुले आपल्या लेखात म्हणतात, ''समाजप्रबोधनाच्या विचारांत तुकोबांनी महत्त्वपूर्ण भर टाकली.त्यांची अभंगवाणी घराघरांत गेली.प्रत्येकाच्या हृदयात तिनं घर केलं.सामाजिक समतेच्या संदर्भात पुढे फुले,आंबेडकरांनी जी चळवळ उभी केली; तिची बीजे तुकोबांच्या जीवन विचारांत आणि कार्यात आढळतात. सर्व जातींतल्या सर्व माणसांना हृदयाशी धरून त्यांना प्रबोधित करणारी संत तुकारामांची

वाणी ही विचार आणि साहित्य या दोन्ही दृष्टींनी सरस आणि संपन्न आहे.''[२] वरील मत पुर्णतःहा उचित वाटते.या सर्वांवरून आजच्या एकविसाव्या चंगळवादी, भोगवादी शतकात संत तुकारामाचे विचार महत्त्वपूर्ण असून समाजासाठी दिपस्तंभ ठरत आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरत नाही.

## निष्कर्ष :—

१) संत तुकाराम महाराजांची अभंगवाणी शतकानुशतकांपासून समाजाला मार्गदर्शन करण्याचे काम करीत आहे. त्यांचे अभंग म्हणजे अनुभवांचे खडे बोल होत.

२) वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान, आचारधर्म, शिकवण जनसामान्यांपर्यत पोहचविण्यात जगत्गुरू संत तुकाराम महाराजांचे फार मोठे योगदान आहे.

३) संत तुकारामांनी अंधश्रद्धा, बुरसटलेल्या रूढी, अनिष्ठ परंपरा यांच्यावर परखडपणे टीका करून लोकांच्या डोळ्यात अंजन घालण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

४) संताची विचारधारा ही पारमार्थिक लोकशाहीच होय, तर समाजप्रबोधनाचे प्रकाशस्तंभ म्हणजे संत होत. संत पृथ्वीतलावरील कल्पतरू होत.

५) संत तुकारामांच्या गाथेतील अधिकाधिक अभंग ईश्वर भक्तीशी जुडलेले असले तरी त्यांच्या अभंगात समाजाचे सूक्ष्म निरीक्षण असल्याचे दिसते.

६) संत तुकारामांच्या गाथेतील अभंगात अर्थपूर्णता, सहजता, लयबद्धता व चटकदारपणा आल्याने त्यांच्या अनेक अभंगाना सुभाषिताचे रूप प्राप्त झाले आहे. मराठी वाङ्मयाला समृद्धी आणण्याचे काम या सुभाषितांनी केले आहे.

## संदर्भग्रंथ :—

१) दैनंदिन तुकाराम गाथा — माधव कानिटकर (अल्पचरित्र मधून) डायमंड पब्लिकेशन्स,पुणे तृतीय आवृत्ती, नोव्हे. २००८
२) संतसाहित्य आणि समाजप्रबोधन — संपादक प्राचार्य रा.तु.भगत, दिलीपराज प्रकाशन,पुणे प्र.आ. २००५ पृ.क्र.७७

३) अक्षरलेणी भाग—१ संपादक मंडळ, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली प्र.आ.२०१२

(संशोधनपर लेखासाठी घेतलेले वरील सर्व अभंग 'दैनंदिन तुकाराम गाथा' संपा. माधव कानिटकर यांच्या ग्रंथातून मधून घेतलेले आहेत.)